# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत उप-कार्यकारी आरोग्य अधिकारी (कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन) विभागाच्या आस्थापनेवरील `समन्वयक` या संवर्गातील खालील तक्त्यात नमूद केलेली पदे भरण्यासाठी निवडयादी तयार करावयाची असल्याने खाली नमूद केलेली विहित अर्हता धारण करणा-या व अटींची पूर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यामध्ये वैयक्तिक माहितीपत्रासह तसेच सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रतींसह अर्ज करावा.

अर्ज पाठविण्याचा पत्ता - उप-कार्यकारी आरोग्य अधिकारी (कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन) यांचे कार्यालय, 1 ला मजला, रुम. नं. 13, एफ/दक्षिण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल, मुंबई – 400012

अर्ज सादर करण्याची तारीख – दि.24.09.2018 ते दि. 27.09.2018 या कालावधीत सकाळी 10.30 ते सायं. 5.30 या कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावा. त्यानंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

<u>पदाचे नाव – समन्वयक, रिक्त जागा – 41</u>

वेतनश्रेणी – रु. 5200-20200 + 1950 ग्रेड पे अधिक अनुज्ञेय भत्ते

पद संकेतांक - समन्वयक

| एकूण रिक्त जागा 41 पदे | कप्पीकृत आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एकूण मावक | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सर्वसाधारण | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 1 | 4 | 10 | 14 |
| | महिला 30% | 2 | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 5 | 7 | 12 |
| | 5% खेळाडू | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 2 |
| | 5% मनपा जलप्रकल्पग्रस्त(अट क्र. 30) | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 2 |
| | 2%भूकंपग्रस्त | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| | 15%माजी सैनिक | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 4 | 6 |
| | 10% अंशकालिन (पदवीधर/ पदविकाधारकउमेदवार) | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 2 | 2 | 4 |
| | 1% अनाथ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | एकूण | **5** | **4** | **0** | **1** | **4** | **0** | **0** | **1** | **15** | **26** | **41** |
| | 3% निःसमर्थ व्यक्तींकरिता आरक्षण | निःसमर्थ व्यक्तींकरिता असलेल्या आरक्षण धोरणानुसार एकूण 338 पदांवर 10 पदे आरक्षित होतात.<br>(1) क्षीणदृष्टी (4-3) = रिक्त पद 1 (2) श्रवणशक्तीतील दोष (3-0) = रिक्त पदे 3<br>(3) चलनवलनविषयक विकलांगता (3-3) = रिक्त पद निरंक 0<br>अशी 4 पदे अपंगाच्या त्या त्या प्रवर्गातून उपलब्धतेनुसार भरण्यात येतील. | | | | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| | शारिरीक पात्रता<br>S – बसणे<br>ST – उभे रहाणे<br>W- चालणे<br>SE – बघणे<br>MF- बोटांची हालचाल करणे<br>R- वाचणे<br>W- लिहिणे<br>H- ऐकणे | पदाची कर्तव्ये<br>क्षयरोग, हिवताप, कुष्ठरोग, अतिसार, उलट्या, पाण्यामार्फत निर्माण होणारे रोग, साथीचे रोग, वयात आलेल्या मुलींना प्रशिक्षणासाठी उद्युक्त करणे, पल्स पोलिओ, स्वच्छता मोहिम, पोलिओ मॉप अप राऊंड, कार्यक्षेत्रातील गलिच्छ वस्ती, नवरात्रोत्सव/गणेश उत्सव मंडळ येथे कर्तव्यार्थ हजर राहणे, आरोग्याबद्दल माहिती देणे, विविध प्रकारचे प्रदर्शन, साहित्याचे वाटप करणे, गणपती विसर्जन, खाजगी वैद्यकीय व्यवसायाकडून मासिक अहवाल गोळा करणे, पीएमपी प्रमाणपत्र, रोगनिदान केंद्राना भेट देणे व तपासणी करणे, वैद्यकीय संस्थेमध्ये दाखल केलेल्या रुग्णांचा पाठपुरावा, जनगणना, निवडणूक, झोपडपट्टी सर्वेक्षण, आर्थिक सर्वेक्षण, दारिद्रय रेषेखाली नागरिकांचे सर्वेक्षण, शालेय मुलांकरिता धर्नुवात व लस टोचणी कार्यक्रम करणे, फील्म शो व्यवस्था, एएफपी रुग्ण, क्षय रुग्णांसाठी डॉट मेडिसिन पुरविणे, कुष्ठरोग, एडस् इत्यादींची माहिती देणे, अशासकीय संस्थांच्या सभांना हजर राहणे, HMIS पोर्टलवर आरोग्य केंद्राचे अहवाल भरणे, महिला आरोग्य समितीमध्ये भाग घेणे, कुटुंब कल्याण कार्यक्रमासाठी लाभार्थिंना प्रवृत्त करणे |

<u>शैक्षणिक अर्हता</u>

1) उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची माध्यमिक शालांत परिक्षा किंवा तत्सम परिक्षा इंग्रजी विषयासह उत्तीर्ण झालेला असावा.

आणि

2) उमेदवार सार्वजनिक आरोग्य संस्था नागपूर/एचएफडब्ल्युटीसी, नाशिक अथवा औरंगाबाद येथील 18 महिन्यांचा अभ्यासक्रम किंवा शासन मान्यताप्राप्त संस्थेची स्वच्छता निरीक्षकाची परीक्षा उत्तीर्ण झाला असला पाहिजे. (महाराष्ट्र शासनाच्या www.MPSC.gov.in या वेबसाईटवर असलेल्या संस्था)

3) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षा 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्चस्तर /निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

4) उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा `ओ` स्तर किंवा `ए` स्तर किंवा `बी` स्तर किंवा `सी` स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जीईसीटीचे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणे किंवा वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराकडे सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहित केलेली एमएससीआयटीची परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून 2 वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, अन्यथा त्यांची सेवा सामाप्त करण्यात येईल.

दि.01.10.2018 रोजी खुल्या प्रवर्गासाठी 18 ते 38 वर्षे पर्यंत व मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत 18 ते 43 वर्षे पर्यंत. अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असल्यास उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा नाही. माजी सैनिक व शारिरिकदृष्ट्या निःसमर्थ असलेल्या उमेदवाराच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा 45 वर्षे पर्यंत शिथिल करण्यात येईल. शासन निर्णयानुसार खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेता उपरोक्त पदांसाठी असलेली वयोमर्यादा 5 वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल. पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांना 46 वर्षापर्यंत वयोमर्यादेत सवलत देण्यात येईल.

निवडीचे निकष :-

सर्वदृष्टीने परिपूर्ण कागदपत्रे सादर केलेल्या अर्हताप्राप्त उमेदवाराने स्वच्छता निरीक्षक परिक्षा अधिक एस.एस.सी. परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या टक्केवारीच्या सरासरीनुसार उमेदवाराची निवडयादी तयार करण्यात येईल. उमेदवाराने एस.एस.सी. परिक्षा अनुक्रमे दुस-या व तिस-या प्रयत्नात उत्तीर्ण केली असल्यास एस.एस.सी. परिक्षेत मिळविलेल्या अंतिम गुणांमधून अनुक्रमे 1 व 2 टक्के गुण वजा केले जातील. अंतिम एस.एस.सी. परिक्षा 3 पेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराचा विचार केला जाणार नाही. समान गुण धारण करणा-या उमेदवारांना जन्मतारखेनुसार वयोजेष्ठतेने प्राधान्यक्रम देण्यात येईल.

निवडीची कार्यपध्दती :-

1. सर्व प्रवर्गातील उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची खुल्या प्रवर्गाचे उमेदवार म्हणून निवड करण्यात येईल. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गामध्ये भरतीकरिता अर्ज करण्याची मुभा राहील.
2. खुल्या प्रवर्गाच्या पदासाठी निवड झालेली असेल अशा उच्च गुणवत्ताधारक मागासवर्गाच्या उमेदवारांची खुल्या पदावर नेमणूक करण्यात येईल.
3. अर्ज केलेल्या उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या तक्त्यातील वेळापत्रकानुसार **उप-कार्यकारी आरोग्य अधिकारी (कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन) यांचे कार्यालय, रुम. नं. 13, 1 ला मजला, एफ/दक्षिण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल, मुंबई – 400012** येथे सर्व मूळ प्रमाणपत्रांसह पडताळणीकरिता उपस्थित रहावे.

`समन्वयक' या पदाकरिता उमेदवारांनी टक्केवारीनुसार भरतीच्या ठिकाणी हजर रहावयाची तारीख व वेळ

| अ. क्र. | प्रवर्ग | एस.एस.सी. व सार्वजनिक आरोग्य संस्थेमधील 18 महिन्याचा अभ्यासक्रम (डिप्लोमा) किंवा शासन मान्यताप्राप्त संस्थेची स्वच्छता निरीक्षक परिक्षेची टक्केवारी | मूळ कागदपत्रांच्या पडताळणीकरिता हजर रहावयाची तारीख व वेळ | |
|---|---|---|---|---|
| 1. | खुला | एस.एस.सी. उत्तीर्ण व डिप्लोमा 70% किंवा अधिक टक्केवारी प्राप्त झालेले उमेदवार | दिनांक 16.10.2018 | सकाळी 11.00 ते दुपारी 1.00 पर्यंत |
| | | आणि<br>एस.एस.सी. उत्तीर्ण व डिप्लोमा 70% पेक्षा कमी टक्केवारी प्राप्त झालेले उमेदवार | | दुपारी 2.00 ते दुपारी 4.00 पर्यंत |
| 2. | अजा, अज | एस.एस.सी. उत्तीर्ण व डिप्लोमा 55% किंवा अधिक टक्केवारी प्राप्त झालेले उमेदवार | दिनांक 17.10.2018 | सकाळी 11.00 ते दुपारी 1.00 पर्यंत |
| | | आणि<br>एस.एस.सी. उत्तीर्ण व डिप्लोमा 55% पेक्षा कमी टक्केवारी प्राप्त झालेले उमेदवार | | दुपारी 2.00 ते दुपारी 4.00 पर्यंत |
| 3. | भज (ब), भज (क) | एस.एस.सी. उत्तीर्ण व डिप्लोमा 55% किंवा अधिक टक्केवारी प्राप्त झालेले उमेदवार | दिनांक 19.10.2018 | सकाळी 11.00 ते दुपारी 1.00 पर्यंत |
| | | आणि<br>एस.एस.सी. उत्तीर्ण व डिप्लोमा 55% पेक्षा कमी टक्केवारी प्राप्त झालेले उमेदवार | | दुपारी 2.00 ते दुपारी 4.00 पर्यंत |
| 4. | इमाव | एस.एस.सी. उत्तीर्ण व डिप्लोमा 55% किंवा अधिक टक्केवारी प्राप्त झालेले उमेदवार | दिनांक 20.10.2018 | सकाळी 11.00 ते दुपारी 1.00 पर्यंत |
| | | आणि<br>एस.एस.सी. उत्तीर्ण व डिप्लोमा 55% पेक्षा कमी टक्केवारी प्राप्त झालेले उमेदवार | | दुपारी 2.00 ते दुपारी 4.00 पर्यंत |

4. समन्वयक या संवर्गाची अर्हता व सर्व अटींची पुर्तता करणा-या उमेदवारांची, गुणवत्तेनुसार तसेच रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार व मागासवर्गीयांच्या आरक्षणानुसार निवडयादी प्रसृत करण्यात येईल. निवड समितीने तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत या दोन्हीपैकी जे आधी घडेल त्या दिनाकांपर्यंत विधीग्राह्य ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

5. भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यावर सामाईक गुणवत्ता यादी (Combined Merit list) सूचना फलकावर प्रसृत करण्यात येईल.

6. तसेच गुणवत्तेनुसार प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल.

7. अर्जाच्या पडताळणीसाठी वर नमूद केलेल्या वेळेपर्यंत उपस्थित असलेल्या उमेदवारांनाच पडताळणी स्थळाच्या आवारात प्रवेश दिला जाईल. नियत वेळेनंतर उपस्थित होणा-या उमेदवारांना भरती स्थळाच्या आवारात भरतीसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

8. उपरोक्त वेळापत्रकात नमूद केलेल्या टक्केवारीनुसार पात्र ठरणा-या उमेदवाराने त्या प्रवर्गासाठी निश्चित केलेल्या तारखेस व वेळेत उपस्थित राहावे.

9. वरील वेळापत्रकात आवश्यकता भासल्यास योग्य ते बदल प्रशासनाकडून करण्यात येतील. आवश्यकता भासल्यास भरती प्रक्रिया महापालिका प्रशासनाकडून कधीही थांबविली किंवा पुढे ढकलली जाऊ शकते.

10. विहित अर्हता धारण करणा-या उमेदवारांनी विहित नमुन्यातील वैयक्तिक माहितीपत्रासह सर्व प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती व साक्षांकित छायांकित प्रतींसह उपरोक्त वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या ठिकाणी निवड प्रक्रियेसाठी उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

<u>सर्वसाधारण अटी</u> :-

1. रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील. तथापि निवड यादी कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.

2. जाहिरातीमध्ये दिलेल्या पदाची संख्या आणि अनुशेष बदलण्यासापेक्ष आहे.

3. अर्ज विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरात, सर्व दृष्टीने पूर्ण असावा. विहित नमुन्यामध्ये नसलेले व विहित दिनांकानंतर प्राप्त झालेले तसेच अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

4. अगोदरच बृहन्मुंबई महापालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचा-याला वर नमूद केलेल्या पदाच्या भरतीसाठी उपस्थित रहावयाचे असेल तर त्याने/तिने त्याच्या/तिच्या खाते प्रमुखाने `ना-हरकत प्रमाणपत्र' सादर करणे आवश्यक आहे.

5. अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्यांच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. त्याच्या छायाचित्राच्या चार अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रियेसाठी उमेदवाराजवळ ठेवणे आवश्यक आहे.

6. अर्जासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे (छायांकित प्रतीसाठी वापरण्यात येणा-या) ए-4 आकारातील असावे.

7. उमेदवारांनी स्वतः निश्चित करावयाचे आहे की, ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल.

8. पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा.

9. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरिता विचार केला जाणार नाही.

10. उमेदवारांनी अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला/जन्मदाखला/अधिवास प्रमाणपत्र/शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्र/डिप्लोमा धारण करीत असलेली अर्हता/संबंधित गुणपत्रिका/सक्षम अधिका-यांनी दिलेले जाती प्रमाणपत्र/जात वैधतेचे प्रमाणपत्र/उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे नवीनतम प्रमाणपत्र यांच्या छायांकित साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात. एस.एस.सी. परिक्षा/स्वच्छता निरीक्षकाची परिक्षा एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण केली असल्यास परिक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र (Attempt Certificate) सादर करणे आवश्यक आहे.

11. उमेदवारास कोणत्याही न्यायालयाने नैतिक अधःपतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो / ती भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुद्ध पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

12. निवड झालेल्या उमेदवाराची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सदर पदाच्या 1 महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल किंवा तशा अर्थाचे (आशयाचे) बंधपत्र सादर करावे लागेल. उमेदवाराने सुरक्षा अनामत रक्कम भरुनसुध्दा मनपामध्ये नेमणूक न स्विकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीत काही कारणास्तव बडतर्फ केल्यास त्यांना भरलेली अनामत रक्कम परत मिळण्याचा हक्क रहाणार नाही.

13. निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही आरोग्य केंद्रात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महापालिकेच्या कोणत्याही आरोग्य केंद्रात बदली योग्य असेल.

14. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रदबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

15. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम 1999 लागू होतील.

16. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर नविन `परिभाषित अंशदान निवृत्ती योजना` लागू ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती योजना (म्हणजे मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम 1953) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

17. सदर भरती अंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व तीन वर्षानंतरचे सेवा सातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

18. विजा(अ), भज(ब), भज(क) या प्रवर्गातील विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.

19. अजा व अज प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागास प्रवर्गातील उमेदवार तसेच महिला आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी ते उन्नत आणि प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे नवीनतम प्रमाणपत्र भरतीच्या वेळेस अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

20. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन परिपत्रक क्र. बीसीसी/2011/प्रक्र/1064/11/16 ब दि.12.12.2011 नुसार मागासवर्गीयांच्या आरक्षित पदावर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवाराने त्याचे जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे.

21. निःसमर्थ (दिव्यांग) उमेदवाराने किमान 40% अपंगत्व असल्याबाबतचे शासकीय सक्षम प्राधिका-यांनी दिलेले प्रमाणपत्र व त्याची प्रत सोबत आणावी.

22. निवड झालेल्या उमेदवारांविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्टेशनकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

23. उमेदवारांना भरतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

24. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्यांचे `ना हरकत प्रमाणपत्र' सादर करावे.

25. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहे.

26. शासकीय सक्षम प्राधिका-यांकडून किमान 40 % अपंगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व निवड झालेल्या निःसमर्थ (दिव्यांग) उमेदवारांना मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे पाठविले जाईल व मुंबई महानगरपालिका मंडळाने सदर निःसमर्थ (दिव्यांग) उमेदवार समन्वयक या पदाचे कर्तव्य बजावण्यास अपंगत्वाच्या दृष्टीकोनातून शारिरीकदृष्ट्या पात्र ठरल्यानंतर त्यास प्रत्यक्ष नेमणूक देण्यात येईल.

27. समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणा-या उमेदवारांनी संबंधित समांतर आरक्षणाच्या दृष्टीकोनातून शासकीय निदेशानुसार सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र व त्याच्या साक्षांकित छायांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे.

28. खेळाडूंचे आरक्षण महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या शा.नि. क्र. राक्रिधो-2002/प्र.क्र.अ.68/क्रियुसे-2 दि. 01.07.2016 च्या तरतूदीनुसार राहील.

29. महिलांचे आरक्षण राज्य शासन, महिला व बाल विकास विभागाच्या शा.नि.82/2001/मसेआ/2000/प्रक्र 415/का-2 दि.25.05.2001 मधील तसेच एसआरव्ही/021/प्रक्र 16 अ दि.13 ऑगस्ट 2014 च्या तरतूदीनुसार राहील.

**30.** प्रकल्पग्रस्तांसाठी सन 2001 महाराष्ट्र अधिनियम क्र.11 महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम 1999 नुसार शासनाने विहित केलेले नियम आणि बृहन्मुंबई महानगरपालिका ठराव क्र.10 दि.03.04.2008 अन्वये मंजूर झालेली मार्गदर्शक तत्वे यानुसार नगरबाहय विभागातील ज्या प्रकल्पग्रस्तांची जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलप्रकल्पासाठी संपादित केली आहे अशा प्रकल्पग्रस्तांसाठीची आरक्षित पदे भरण्यात येतील.

**31.** भुकंपग्रस्तासाठी आरक्षित पदे महाराष्ट्र शासन, सा.प्र. विभाग, भूकंप 1008/प्र.क्र. 145/2008/16अ दि.27.10.2008 व शा.नि. भूकंप 1009/प्र.क्र. 207/2009/16अ दि.27.08.2009 मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार स्वतंत्रपणे भरण्यात येतील. भुकंपग्रस्त असल्यास सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र सादर करावे.

**32.** माजी सैनिकांसाठी 15 % प्रमाणे आरक्षित पदे शासन निदेशानुसार भरण्यात येतील. कमाल वयोमर्यादा 45 वर्षे इतकी राहील. स्वातंत्र्य सैनिकांचे अथवा त्यांच्या विधवा वारस पत्नीचे निधन झाल्यास त्यांनी केलेले नामनिर्देशन त्यांच्या मृत्यु पश्चात अस्तित्वात रहाणार नाही. उमेदवारास माजी सैनिक विमुक्त प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

**33.** शासन निर्देशानुसार स्वातंत्र्यसैनिक व त्यांचे नामनिर्देशित यांना शासनाच्या अर्हता व सवलती विचारात घेऊन महापालिका सेवेत समाविष्ट करुन घेण्यात येईल.

**34.** फोटो असलेले ओळखपत्र उदा.आधारकार्ड, पॅनकार्ड इत्यादी अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**35.** सुशिक्षित बेरोजगार आर्थिक सहाय्य योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयात पदवीधर/पदविकाधारक अंशकालिन कर्मचारी म्हणून तीन वर्षे दरमहा मानधनावर काम केलेल्या बाबतच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याबाबत सेवायोजन कार्यालयाच्या नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत कागदपत्रांच्या पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

**36.** अर्ज सादर करावयाची पद्धत :- पात्रता व निकषांची पूर्तता करणा-या उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह जाहिरातीत नमूद केलेल्या ठिकाणी सादर करणे आवश्यक आहे व जाहिरातीत दर्शविलेल्या ठिकाणी प्रमाणपत्रांच्या पडताळणीकरिता हजर राहणे आवश्यक आहे.

<u>विशेष सूचना</u>

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

2. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविले जाईल.

3. मध्यस्थ/ठक/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.

4. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहे.

5. सेवायोजन कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार अर्ज आणि आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे.

6. वर नमूद केलेल्या रिक्त पदांच्या अहवालानुसार उमेदवार उपलब्ध होताच भरतीची प्रक्रिया त्वरित बंद करण्याचे अधिकार प्रशासनाला रहातील.

सही/-
डॉ. पद्मजा केसकर
कार्यकारी आरोग्य अधिकारी

| |
|---|
| उमेदवाराने त्याचे अलिकडे काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून फोटोवर स्वाक्षरी करावी 2.5 से.मी. 3 सें.मी. |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## अर्जाचा नमुना

* पदाचे नाव : समन्वयक पद संकेतांक क- 464

प्रति,

--------------------------------------------------------------

(खात्याचे नाव व पत्ता)

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत उप-कार्यकारी आरोग्य अधिकारी (कुक व माबासं) यांच्या अखत्यारितील खात्यामध्ये वर नमूद केलेल्या पदाकरिता दिनांक ---------------- च्या जाहिरातीनुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज सादर करीत आहे. :-

1) (अ) संपूर्ण नाव (आडनांव प्रथम) (मराठीत)

| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आडनाव | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| नाव | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| वडिलांचे/पतीचे नाव | | | | | | | | | | | | | | | | | | | |

(ब) वडिलांचे/पतीचे संपूर्ण नाव : श्री. ----------------------------------------------------------------------------------------------------------------

2) पत्ता (पत्रव्यवहाराचा)

| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घर क्रमांक /इमारतीचे नांव | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| रस्त्याचे नांव | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| विभागाचे नांव आणि शहर | | | | | | | | | | | | | | | | | | | |

पिन कोड नं. [ ][ ][ ][ ][ ][ ]

दूरध्वनी क्रमांक [ ] भ्रमणध्वनी क्रमांक [ ]

3) लिंग पुरुष [ ] स्त्री [ ]

4) उमेदवार ज्या प्रवर्गाचा आहे त्यापुढे (√ ) असे चिन्ह करा.

| अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

5) उमेदवार समांतर आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छिते/इच्छितो? होय / नाही

(असल्यास योग्य तेथे (√ ) असे चिन्ह करा.)

१) महिला आरक्षण [ ] २) माजी सैनिक [ ] ३) खेळाडू [ ] ४) प्रकल्पग्रस्त [ ]

५) भुकंपग्रस्त [ ] ६) अंशकालिन पदवीधर [ ] ७) अनाथ [ ]

6) जात /पोटजात /प्रवर्ग :

जात वैधता प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र यांची छायांकित साक्षांकित प्रत सोबत जोडावी. :

7) उमेदवार अपंग आहे का ? होय / नाही

(असल्यास अपंगत्वाचा प्रकार/ प्रवर्ग नमूद करुन किमान 40% अपंगत्वाची सक्षम प्राधिका-याने दिलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी.

आवश्यक तेथे योग्य तेथे (√ ) असे चिन्ह करा.

1) अंध/क्षीणदृष्टी 2) अस्थीव्यंग 3) कर्णबधीर

8) जन्मदिनांक : दिनांक महिना वर्ष

9) शैक्षणिक अर्हता :-

| परिक्षेचे नाव | मंडळ / विद्यापीठाचे नाव | प्राप्त झालेले गुण | | मराठी प्राप्त गुण (100 पैकी) | उमेदवार किती प्रयत्नात परिक्षा उत्तीर्ण झाला. |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण पैकी | टक्केवारी | | |
| १. माध्यमिक शालांत परीक्षा/ तत्सम परीक्षा (इंग्रजी विषयासह) | | | | | |
| २. स्वच्छता निरीक्षकाचा अभ्यासक्रम | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

(सोबत गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत जोडण्यात यावी)

| | | | |
|---|---|---|---|
| 10) | संगणक विषयक ज्ञान एम.एस.सी.आय.टी. किंवा शासनाने विहित केलेले संगणकविषयक अभ्यासक्रम | : | ........................<br>........................ |
| 11) | सेवायोजना कार्यालयाचे नोंदणीपत्र असल्यास त्याचा क्रमांक व दिनांक, नुतनीकरण दिनांक | : | ........................<br>........................ |
| 12) | (अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का?<br>(ब) शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. | : | ........................<br>........................ |

| | | | |
|---|---|---|---|
| 13) | (अ) उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी/ न्यायालयीन प्रकरण प्रलंबित व प्रस्तावित आहे का?<br>(ब) असल्यास त्याबातचा तपशील द्यावा. | : | ......................................<br>...................................... |
| 14) | (अ) सध्या अर्जदार इतरत्र नोकरीस आहे का?<br>(ब) असल्यास त्याबाबतचा तपशील देऊन सध्याच्या नियोक्त्याचे `ना-हरकत` प्रमाणपत्र जोडावे) | : | ......................................<br>...................................... |
| 15) | (अ) उमेदवार माजी सैनिक/ खेळाडू/ प्रकल्पग्रस्त/ भुकंपग्रस्त, पदवीधर/ पदवीकाधारक अंशकालीन उमेदवार आहे का ? | | ......................................<br>...................................... |
| 16) | स्थानिक पोलिस स्टेशनचा पत्ता | : | ......................................<br>...................................... |

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार रहाणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे.

आपला /आपली विश्वासू,

अर्जदाराची सही/-

अर्जदाराचे नाव

दिनांक :

सोबत :